प्रेसनोट दि.०५/०१/२०१८

क्वीकर वेबसाईटवर ऑनलाईन कुत्रा विकण्याच्या बहान्याने आर्थिक फसवणूक करणारा तरूण सायबर क्राईम सेलच्या जाळ्यात.

ऑनलाईन खरेदी-विक्री करण्याऱ्या वेबसाईटवर विवीध प्रजातीचा कुत्रा विक्री संदर्भातील अनेक जाहीराती अपलोड करून नागरिकांकडून पैसे उकडण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. दाखल गुन्ह्यातील फिर्यादी ह्या उच्च दर्जाच्या प्रजातीचा कुत्रा विकत घेण्यासाठी इंटरनेटवर सर्फीग करीत असताना क्वुकर या खरेदी-विक्री या वेबसाईटवर उच्च दर्जाच्या प्रजातीचा कुत्रा जहिराती दिसून आली. फिर्यादी यांनी सदर जहिरातीमध्ये संपर्कासाठी नमुद करण्यात आलेल्या मोबाईल नंबरवर व्हॅटसअॅप या मॅसेंजर अॅप्लिकेशनव्दारे संपर्क केल्यानंतर अज्ञान व्यक्तीने फिर्यादी यांना पैसे जमा कल्यानंतर कुत्रा पार्सलव्दारे घरी पाठविण्यात येईल. फिर्यादी यांना कुत्रा विकत घेण्यासाठी अज्ञात व्यक्तीने पैसे जमा करण्यास भाग पाडले. फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली असल्याने कोंढवा पोलीस ठाणे गु.रं.नं. ०७/२०१८, भा.द.वि. कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ६६ डी, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील फिर्यादी यांनी सायबर क्राईम सेल येथे झालेल्या आर्थिक फसवणूकीबाबत तक्रार केली होती. मा. पोलीस उप आयुक्त, आ.व.सा., गुन्हे यांच्या मागदर्शनाखाली दाखल गुन्ह्याचा समांतर तपास हा सौ. मनिषा झेंडे, पोलीस निरीक्षक, सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा करीत आहेत. सायबर सेलच्या पथकाने त्वरीत संबधित कंपन्यांकडून माहिती प्राप्त करून आरोपी नामे राजन जनार्दन शर्मा, रा- औंध, पुणे (मुळ राहणार- पश्चिम बंगाल) यास निष्पन्न करून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडुन २ मोबाईल, ०१ लॅपटॉप, ०१ डोंगल, पाच सिमकार्ड व ०२ डेबीट कार्ड हे जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपी यास ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी कोंढवा पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याचेकडे करण्यात तपासामध्ये पुणे शहर या व्यक्तीरिक्त कर्णाटक, आंध्रप्रदेश, गुजरात व केरल राज्यातील ३० -४० लोकांना अशा प्रकारे फसवणूक करून आर्थिक फसवणूक केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर बाबत येरवडा पोलीस स्टेशन व हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदरची कारवाई ही श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, मा. मिलींद पाटील, सहा पोलीस आयुक्त, सायबर सेल, मार्गदर्शन खाली पो.नि. सौ. मनिषा झेंडे, पोलीस कर्मचारी- दिपक भोसले, किरण अब्दागिरे, आदेश चलवादी यांच्या पथकाने केली आहे.

याद्वारे पुणे शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा ऑनलाईन खरेदी – विक्री करणाऱ्या वेबसाईटवरील जहिराती यांची पडताळणी करूनच पैसे जमा करावेत तसेच खात्री केल्याशिवाय स्वतःची वैयक्तिक माहिती देवू नये त्याबाबत योग्यं ती खबरदारी घ्यावी. तसेच असा कोणताही प्रकार लक्षात आल्यास जवळचे पोलीस स्टेशनशी अथवा सायबर क्राईम सेल विभागाशी संपर्क साधावा.